DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

# जिल्हादंडाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

## (उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 Email ID- rdc1osmanabad@gmail.com

---

संदर्भ:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. भारत सरकार, गृह मंत्रालय, यांचे आदेश क्र. 40-3/2020-डीएम-1(ए) दिनांक 29 जुलै 2020.
5. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 29 जुलै 2020.
6. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 02.08.2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26
दिनांक:- 11 /08/2020.

**सुधारित आदेश :-**

कोरोना कोविड-19 विषाणुमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरिता व त्यावर नियंत्रण आणण्यासाठी संदर्भ क्र. 4 व 5 चे अनुषंगाने संदर्भ क्र. 6 अन्वये दि. 31 ऑगस्ट 2020 पर्यंत उस्मानाबाद जिल्ह्यात लॉकडाऊन वाढविण्यात आले असून लॉकडाऊनमध्ये करावयाच्या कार्यवाहीबाबत आदेश पारित केलेला आहे.

संदर्भ क्र. 6 चे आदेशातील **परिशिष्ट 2 मधील मुद्दा क्र. 1, 4 व 5 मध्ये या आदेशान्वये दुरुस्ती** करण्यात येत असून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

1. सर्व मार्केट / दुकाने ही सकाळी 9.00 ते दुपारी 3.00 वाजेपर्यंत उघडी राहतील. तथापि, कोणत्याही प्रकारचे सामाजिक अंतराचे (Social Distancing) निकष पाळले गेले नाही अथवा गर्दी केल्यास सदरचे मार्केट / दुकाने शासकीय यंत्रणेकडून तात्काळ बंद करण्यात येतील.
2. उस्मानाबाद जिल्ह्यात पेट्रोल व डिझेल पंप सकाळी 8 ते दुपारी 3 या वेळेत चालू राहतील. तथापि उस्मानाबाद शहरातील पोलीस वेलफेअर पेट्रोल पंप दररोज 24 तास (24×7) चालू राहील.
3. उस्मानाबाद जिल्ह्यातील राष्ट्रीय व राज्य महामार्गांवरील पेट्रोल पंप दररोज 24 तास (24×7)चालू राहतील.
4. उस्मानाबाद जिल्ह्यातील बेकरी व स्वीट मार्ट दुकाने दररोज सकाळी 9 ते दुपारी 3 वाजेपर्यंत चालू राहतील. तसेच दुपारी 3 ते रात्री 10 वाजेपर्यंत घरपोच सेवा (होम डिलीव्हरी) देण्यास परवानगी राहील.
5. सर्व प्रकारची औषधी दुकाने, फार्मसी, जन औषधी केंद्रे आणि वैद्यकीय उपकरणांची दुकाने (चष्म्याच्या दुकानांसह) सकाळी 9 ते दुपारी 3 वाजेपर्यंत चालू राहतील. फक्त सर्व सरकारी व खाजगी रुग्णालयांस संलग्न असलेली मेडीकल्स दररोज 24 तास (24 × 7) चालू राहतील.

Scanned by CamScanner

6. संपूर्ण उस्मानाबाद जिल्ह्यात बी बियाणे व खते या कृषि निविष्ठांची विक्री करणारी दुकाने/आस्थापना, बिज प्रक्रिया केंद्र, त्यानुषंगीक बियाणे पॅकींग, हाताळणी केंद्र, बीज परिक्षण प्रयोगशाळा, कृषी यंत्रसामग्री, त्यांचे सुटे भाग (त्याच्या पुरवठा साखळीसह) व त्यांच्या दुरुस्तीची दुकाने सकाळी 9 ते दुपारी 3 या वेळेत चालू राहतील.
7. उस्मानाबाद जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमधील सर्व आस्थापना सकाळी 7 ते सायंकाळी 7 वाजेपर्यंत चालू राहतील.
8. रेस्टॉरन्टस मध्ये फक्त स्वयंपायकगृह चालु ठेवुन अन्न पदार्थाची घरपोच सेवा (होम डिलीव्हरी) देण्यास सकाळी 9 ते रात्री 10 या वेळेत परवानगी राहील.
9. किराणा दुकाने सकाळी 9 ते दुपारी 3 या वेळेत चालू राहतील.
10. भाजीपाला मार्केट/भाजीपाला विक्री, दूध विक्री/दूध विक्री केंद्र दररोज सकाळी 7 ते दुपारी 3 या वेळेत चालू राहतील.
11. उस्मानाबाद जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गांवरील व राज्य महामार्गांवरील धाबे दररोज 24 तास (24 × 7) चालू राहतील.
12. पान, तंबाखू इ. पदार्थांची दुकाने बंद राहतील.
13. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी-3/सीआर-26 दि. 04 मे 2020 या आदेशामध्ये नमूद केलेल्या गैरकृत्यांबाबत दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश पुढील आदेशापर्यंत संपूर्ण जिल्ह्यात पूर्वीप्रमाणेच लागू राहतील.
14. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 11 मे 2020 या आदेशामध्ये नमूद गृह विलगीकरण (Home Quarantine) च्या नियमांचे उल्लंघन करणा-या व्यक्तीविरोधात दंडात्मक कारवाई करणेबाबतचे आदेश संपूर्ण उस्मानाबाद जिल्ह्यात पुढील आदेशापर्यंत पूर्वीप्रमाणेच लागू राहतील.
15. मॉल्स आणि मार्केट कॉम्प्लेक्स, सिनेमागृहाव्यतिरिक्त सकाळी 09.00 ते दुपारी 03.00 या वेळेत दिनांक 05 ऑगस्ट 2020 रोजीपासून सुरु राहतील. मॉल्स व मार्केट कॉम्प्लेक्समधील फुड कोर्ट / रेस्टॉरंट्स फक्त त्यांना घरपोच सेवा पुरविण्यासाठी सुरु ठेवता येतील. मात्र कोविड-19 चा प्रादुर्भाव पसरु नये यासाठीच्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने निश्चित करुन दिलेल्या प्रमाणित कार्यपद्धतीचे त्यांनी काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.
16. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये कोविड-19 च्या रुग्णसंख्येमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याने कोविड-19 चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचे अनुषंगाने नागरिकांनी दुपारी 03.00 नंतर वैद्यकीय तातडीची निकड वगळता इतर कारणासाठी घराबाहेर न पडता प्रशासनास सहकार्य करावे. तसेच दर शनिवारी जनता कर्फ्यू राहील.

सदरील आदेशाची कडक अंमलबजावणी सर्व संबंधित यंत्रणांनी करावी. कुठल्याही व्यक्तींकडुन या आदेशातील सुचनांचे उल्लंघन झाल्यास त्यांचेविरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 च्या कलम 51 ते 60 व भारतीय दंड संहिता कलम 188 नुसार कायदेशीर कारवाईस पात्र राहील. तसेच अन्य कायदेशीर कारवाई देखील केली जाईल.

सदरचा आदेश आज दि. 11/08/2020 रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिला आहे.

11/8/20

(दिपा मुधोळ-मुंडे)

**जिल्हादंडाधिकारी उस्मानाबाद तथा अध्यक्ष,**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

Scanned by CamScanner

प्रत:- मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. उस्मानाबाद.
5. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद.
6. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
7. व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक, उस्मानाबाद.
8. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
9. विभाग नियंत्रक, रा. प. मंडळ, उस्मानाबाद.
10. उपविभागीय अधिकारी तथा INCIDENT COMMANDER सर्व जि. उस्मानाबाद.
11. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद.
12. तहसिलदार तथा INCIDENT COMMANDER सर्व जि. उस्मानाबाद.
13. मुख्याधिकारी नगर परिषद / नगर पंचायत सर्व जि. उस्मानाबाद.
14. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

11/8/20

**जिल्हादंडाधिकारी उस्मानाबाद तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD

Scanned by CamScanner